REVIEW OF RESEARCH

# संयुक्त महाराष्ट्रातील मराठवाडा : एक विकासात्मक मागोवा




**प्रा. डॉ. अनिल दत्तू देशमुख**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा, जि. उस्मानाबाद.

## १) प्रस्तावना :-

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन इतिहासात प्रथमच सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन होऊन त्यांच्यामध्ये राजकीय ऐक्य प्रस्थापित झाले. या पूर्वी हे मराठी भाषिक प्रदेश मध्य प्रांत, हैद्राबाद व मुंबई या तीन राज्यात विभागलेले होते. त्यावेळी हे सर्व प्रदेश संयुक्त भाषिक राज्यात समाविष्ट होते. त्यावेळी मध्य प्रांतातील लोकांना हिंदी भाषिकांचे, हैद्राबाद राज्यातील लोकांना उर्दु-तेलगू भाषिकांचे वा मुंबई प्रातांतील लोकांना गुजराती भाषिकांचे प्रभुत्व आहे अशी त्यावेळी मराठी भाषिक लोकांची भावना होती. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना करण्यासाठी लोकांनी जी चळवळ उभी केली होती त्यामागे ही भावनाच प्रभावी होती. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होत असताना या विकसित मुंबई राज्यातील मराठी प्रदेशातील नेत्यांनी विदर्भ व मराठवाडा या तुलनेने मागास असलेल्या प्रदेशातील लोकांना १९५३ सालचा नागपूर करार, १९५६ सालचे भारतीय संविधानातील कलम ३७१(२), १९५६ व १९६० साली तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण यांनी विधानसभेत दिलेली जाहीर अश्वासने ईत्यादींच्या माध्यमातून विकासाचे अभिवचन दिले होते. त्यामुळेच संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चळवळ यशस्वी होऊ शकली. या चळवळीला पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोठा पाठींबा मिळाला. मराठवाडा प्रदेशातील लोकांना हैद्राबाद राज्यामध्ये रहायचे नसल्यामुळे त्यांचाही या चळवळीस चांगला पाठिंबा मिळाला. विदर्भ प्रदेशामध्ये त्यामानाने या चळवळीस कमी पाठिंबा मिळाला पण शेवटी या चळवळीचा विजय होऊन केंद्र सरकारला संयुक्त महाराष्ट्राची मागणी मान्य करावी लागली.

## २) संशोधन समस्या :-

संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्यासाठी तब्बल १०६ व्यक्तींना बलिदान द्यावे लागले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या दैदिप्यमान संघर्षातून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. आज संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन ५७ वर्षे पूर्ण झाली. साहजिकच मागील ५७ वर्षात महाराष्ट्राने केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे तसेच मागील झालेल्या चूकीच्या धोरणांचाही नि:पक्षपातीपणे विचार करून तो सुधारण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण एकीकडे बेळगाव, निपाणी, कारवार, भालकी या सीमावर्ती भागातील जनतेचा संयुक्त महाराष्ट्रात येण्यासाठी संघर्ष चालू आहे तर दुसऱ्या बाजूने विदर्भ महाराष्ट्रातून स्वतंत्र होऊ इच्छितो. हा विरोधाभास निश्चितच गोंधळाची परिस्थिती निर्माण करणारा आहे. यावरून एक निष्कर्ष काढता येईल तो म्हणजे केवळ भावनांच्या आधारे संयुक्त महाराष्ट्र टिकवून ठेवणे अवघड असून तो टिकवायचा झाल्यास "महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकास" हेच त्याचे खरे उत्तर होय. त्यामुळे पुढील काही वर्षात राज्याने याच धोरणाचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील प्रादेशिक असमतोलाचे शास्त्रशुद्ध अध्ययन होण्याची आवश्यकता आहे. हा प्रश्न केवळ अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून समजून घेणे पुरेशे नसून त्यामागच्या विकासाच्या राजकारणाचा शोध घेणे महत्वाचे आहे.

## ३) संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमागील भूमिका :-

एकभाषी राज्य रचनेमुळे आपल्या भागाच्या विकासाला चालना मिळेल अशी मराठी लोकांची भावना होती. लोकशाही जीवन साकारण्यासाठी सामान्य माणसाच्या भाषेत राज्यकारभार चालणाऱ्या भाषिक प्रांतातील लोकांना लोकशाहीचे कामकाज समजणे, ते जीवन

अनुभवणे व त्यात भाग घेण्याची गरज वाटणे शक्य होईल. त्यामुळे जीवनाला एक हेतू प्राप्त होऊन एकभाषी प्रांतामुळे आपल्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रगतीसाठी संधी प्राप्त होईल अशी मराठी भाषिक प्रांतातील लोकांना अपेक्षा होती. हैद्राबाद संस्थानामध्ये धर्मांध सत्ता होती त्यामुळे तेथील मराठी जनतेची भाषा व संस्कृतीचा विकास कुंठीत झाला होता व जनतेला कोणतेही मुलभूत अधिकार नव्हते. संरजामी व्यवस्था असल्यामुळे जहागिरदार, जमीनदार व सावकार यांच्याकडून जनतेचे शोषण होत राहिल्याने येथे अज्ञान व दारिद्र्य कमालीचे होते. जनतेला लोकशाही हक्क प्राप्त व्हावेत व जनतेला जबाबदार राज्यपध्दती असावी आणि शोषणरहित समाजरचना निर्माण व्हावी या अपेक्षेने मराठवाडा प्रदेश हा संयुक्त महाराष्ट्रामध्ये सामील झाला.

## ४) महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण :-

"माझा लोकशाही भारत तो असेल, ज्यामध्ये गरीबीतील गरीब व्यक्तीस श्रीमंतातील श्रीमंत व्यक्ती इतकी संधी मिळू शकेल." अशी लोकशाहीसंबंधी माहात्मा गांधी यांची धारणा होती, परंतु लोकशाही ही बहुमतावर अधारित निवडणूक केंद्रित शासनप्रणाली असल्यामुळे यात खूप मोठा राजकारणाचा भाग येतो. येथे लोकप्रतिनिधी हे लोकानुनय करण्यासाठी विकास योजनांचे राजकारण करताना दिसतात आणि त्याचाच परिणाम होऊन राज्यात विकासाचा प्रादेशिक असमतोल निर्माण होतो आणि त्यातूनच प्रादेशिक विकास अंदोलने, वेगळया राज्याची मागणी अशा माध्यमातून विकासाच्या राजकारणाचा अविष्कार होताना दिसून येतो.

कोणत्याही राज्याच्या विकासात निर्माण झालेला विकासाचा असमतोल हा वरकरणी आर्थिक विकासाचा प्रश्न वाटत असला तरीही त्याला राजकारणाचीही एक महत्वपूर्ण बाजू असते. लोकप्रतिनिधी हे आपल्या राजकीय सोयीनुसार या प्रादेशिक मागासलेपणाचेही राजकारण करताना दिसतात. त्यामुळे बऱ्याच वेळेला राज्याच्या विकासाची धोरणे आखताना प्रादेशिक असमतोल नष्ट करण्यासाठी धोरणे ठरवितात पण प्रत्यक्षामध्ये हा असमतोल दूर होणार नाही अशा पध्दतीने या धोरणांची अंमलबजावणी करतात आणि त्यामुळेच राज्याच्या विकासातील असमतोल कमी होण्याऐवजी वाढत जाताना दिसून येतो. महाराष्ट्रातील सामाजिक-आर्थिक विकासातील प्रादेशिक असमतोल हा अलिकडील काळातील सामाजिक व राजकीय गुंतागुंतीचा एक संवेदनशील मुद्दा बनला आहे. विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या प्रादेशिक विभागांचे मागासपण आणि विभागीय असमतोलामुळे गेली ५७ वर्ष महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात तणाव कायम राहिले आहेत.

## ५) महाराष्ट्राच्या विकासात मराठवाड्याचे मागासलेपण :-

महाराष्ट्रातील प्रदेशांमध्ये असमान विकास होण्यासाठी अनेक प्रदेश विशिष्ट कारणे कारणीभूत असलेली दिसून येतात. कोणताही देश किंवा राज्यामध्ये प्रादेशिक असमतोल आपोआप निर्माण होत नाही तर तो निर्माण होण्यास कांही घटक जबाबदार असतात. या घटकांमध्ये कांही भौगोलिक, ऐतिहासिक आणि मानवनिर्मित असतात. प्रादेशिक असमतोल हा नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपलब्धतेतील तफावत, ऐतिहासिक जडण घडण, पायाभूत सुविधांचा अभाव, आद्योगिकरणाचा अभाव, विद्युतीकरणाचा अभाव, सरासरी दरडोई उत्पन्न कमी, निर्माणक क्षेत्रातील रोजगार कमी, आरोग्य सुविधांचा अभाव, नागरीकरणाचा अभाव, दर्जेदार शिक्षण सोयींचा अभाव अशा विविध कारणांमुळे राज्यातील विकासात प्रदेशनिहाय असमतोल मोठ्या प्रमाणात वाढत असलेला दिसून येतो.

१) आजही मराठवाडा प्रदेशातील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. शेती व्यवसायावर अधिक अवलंबून असणे हे या प्रदेशाच्या मागासलेपणाचे महत्वाचे लक्षण आणि कारण आहे. भारताची जनगणना २०११ च्या माहितीनुसार मराठवाड्यात महाराष्ट्रातील एकूण शेतकऱ्यांपैकी ३८.३६ टक्के इतके शेतकरी व ३५.८१ टक्के शेतमजूरांचे प्रमाण आहे. राज्य सरासरी पातळीवर हेच प्रमाण २५.४ टक्के इतके शेतकरी व २७.३ टक्के शेतमजूर असे प्रमाण आहे. यावरून आजही मराठवाड्यातील लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती हेच दिसून येते. एखाद्या प्रदेशाचे आर्थिक मागासलेपण कृषी क्षेत्रात काम करणारी लोकसंख्या किती आहे, यावरूनही स्पष्ट होते. कारण मागासलेल्या प्रदेशामध्ये कृषी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अधिक असते. याउलट विकसित प्रदेशामध्ये कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण अल्प असते.

२) मराठवाड्यातील लोकांचे शेतीवरील अवलंबित्व जास्त असले तरीही शेतीसाठी वापरलेल्या जुन्या पारंपारिक पध्दती आणि साधनामुळेही उत्पादनाची पातळी ही कमी आहे. मराठवाड्यातील प्रमुख पीकांचे प्रति हेक्टरी सरासरी उत्पादन हे राज्य सरासरीच्या खूपच खाली असलेले दिसून येते. उदा. उस पीकाचे प्रति हेक्टरी राज्य सरासरी उत्पादन हे ८०.३० टन इतके होते, तर मराठवाड्यात ५७.६४ टन इतके होते. भूईमूग पीकाचे प्रति हेक्टरी राज्य सरासरी उत्पादन हे १०९६ कि.ग्रॅ. इतके आहे, तर मराठवाड्यात ६७५ कि.ग्रॅ. इतके होते. इतरही पीक उत्पादनाबाबत मराठवाडा राज्य सरासरीच्या खाली आहे. म्हणजेच पीक उत्पादनात मराठवाडा इतर प्रदेशाच्या तुलनेत मागे असलेला दिसून येतो. उत्पादनाच्या अस्थिरतेमुळे वर्षानुवर्ष दैन्य आणि त्यातून दैववाद, निष्क्रियता वाढत राहिली आणि उत्पादन कमी कमी होत राहिले हे दुष्टचक्र पिढ्यानपिढ्या चालू आहे.

३) महाराष्ट्रामध्ये शेतीसाठी पीक लागवडीच्या सरासरी खर्चाच्या प्रमाणात कृषी कर्जाचे वितरण केले जोते. राज्यामध्ये कृषी कर्ज वितरणात प्रदेशनिहाय मोठी तफावत असल्याचे दिसून येते. उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात पीक लागवड खर्चाच्या बाबतीत, दर हेक्टरी १४.३ टक्के इतके कृषी कर्ज मिळते, तर मराठवाडा प्रदेशात हे प्रमाण ६.३ टक्के आणि विदर्भ प्रदेशामध्ये ७.३ टक्के इतके असून हे मराठवाडा व विदर्भाच्या

मागास प्रदेशामध्ये कमी प्रमाणात कर्ज मिळत असल्याचे दर्शविते. तसेच प्रत्येक शेतकऱ्याला वितरित केलेल्या कर्जामध्येदेखिल तफावत असून ते पश्चिम महाराष्ट्रात रू. ६,०६० इतके, मराठवाड्यात रू. ३,३५४ इतके आणि विदर्भात रू. ४,४८७ इतके आहे. सन २०११-१२ या वर्षाच्या कृषी कर्ज वितरणातून मराठवाडा व विदर्भातील अनुक्रमे २१ टक्के व १९ टक्के वितरणाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्रात ५६ टक्के नियत वाटप झाल्याचे दिसते. हे कर्जाच्या नियत वाटपात मोठे अंतर असल्याचे दर्शक आहे. अशाप्रकारे मराठवाडा व विदर्भातील लागवडीचा खर्च व कृषी कर्ज वितरणाचे प्रमाण याबाबतीत शासकीय धोरणात स्पष्टपणे प्रादेशिक भेदभाव होत असल्याचे दिसून येते.

४) मराठवाडा प्रदेशामध्ये शेती विकासासाठी आवश्यक असलेल्या जलसिंचनाच्या सोयी आणि संस्थात्मक संघटनांचाही अभाव आहे. महाराष्ट्रामध्ये निर्माण केलेल्या सिंचन सोयीनुसार (जून २०१२ पर्यंत) प्रत्यक्ष सिंचन क्षेत्राचे लागवडीयोग्य क्षेत्राशी प्रमाण हे राज्याची सरासरी ८.७ टक्के इतकी असताना मराठवाड्यात हे प्रमाण फक्त ४.८ टक्के इतकेच आहे. या सिंचन सुविधेच्या अपुऱ्या विकासामुळेही मराठवाड्यातील शेती क्षेत्राचा विकास होऊ शकला नाही.

५) राज्यामध्ये सिंचन क्षेत्राच्या विकासात खूप मोठा भेदभाव दिसून येतो. जून २०१२ पर्यंत निव्वळ पेरणीयोग्य क्षेत्राच्या तुलनेत निर्मित सिंचन क्षेत्राचा प्रदेशनिहाय विचार केल्यास मराठवाडा ४९.९५ टक्के, विदर्भ ४२.४७ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये हेच प्रमाण ७७.३५ टक्के इतके असल्याचे दिसून येते. राज्य मंत्रिमंडळाने १/२/२००० रोजी मराठवाडा-कृष्णा प्रकल्प मंजूर करून प्रकल्पाची कामे एका वर्षात प्राथम्याने सुरूवात करण्याचे आदेश देऊनसुध्दा अद्यापही प्रकल्पाच्या कार्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली नाही. दुसरीकडे मात्र कृष्णा खोऱ्यात महाराष्ट्राला मिळालेले ५९४ अ.घ.फू. पाणी इ.स. २००० पर्यंत वापरले नाही तर ते महाराष्ट्राला गमावून बसावे लागेल असा अपप्रचार करून कदाचित प्रतिवर्षी अधिकाधिक निधी विशिष्ट प्रदेशाकडे वळविण्याचा प्रकार दिसून येतो. शिवाय कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी उपलब्ध पाण्यातून देण्याऐवजी त्याची नाहक सांगड कृष्णा-भीमा स्थैर्यिकरण प्रकल्पाशी घालून मराठवाड्याच्या पाण्याचा न्याय्य हक्क नाकारला जात आहे. अशा प्रकारे सिंचन विकासाबाबत शासनाचे धोरण मराठवाड्यासारख्या मागास प्रदेशावर अन्याय करणारे आहे. त्यामुळेच राज्याच्या विकासातील प्रादेशिक असमतोल वाढत असल्याचे दिसून येते.

६) भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्याची औद्योगिक प्रगती लक्षणीय असली तरीही ती राज्यामध्ये सर्वत्र सारखी दिसून येत नाही. औद्यागिक घटकांचे विशिष्ट प्रदेशात व त्यातही विशिष्ट शहरातच केंद्रित झाले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये कांही मुंबई-ठाणे-नाशिक-पुणे असे विकसित बेटे निर्माण झाली आहेत. मराठवाडा, विदर्भ प्रदेश याबाबतीत मागे राहिल्याने त्याचा विपरित परिणाम येथील जनतेच्या राहणीमानावर दिसून येतो. मागास भागामध्ये बिगर शेती उद्योगांच्या अभावामुळे जास्तीत जास्त लोक शेतीवरच काम करू पाहतात. त्यामुळे बेकारी आणि छुपी बेकारी आणि त्यातून गरीबी असे दुष्टचक्र निर्माण झाले आहे.

७) राज्यामध्ये औद्योगिक विकासाच्याबाबतीत खूप मोठा प्रादेशिक असमतोल दिसून येतो. सध्या (३१ मार्च २०१३) असलेल्या एकूण औद्योगिक घटकांपैकी ७१.६१ टक्के औद्योगिक घटक हे उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये आहेत. हेच प्रमाण मराठवाडा १५.७० टक्के आणि विदर्भ प्रदेशाध्ये १२.६७ टक्के इतके आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण औद्योगिक रोजगारापैकी ८३.३६ टक्के इतका रोजगार उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये उपलब्ध आहे. हेच प्रमाण मराठवाडा ६.८२ टक्के आणि विदर्भ ९.९१ टक्के इतके आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मराठवाड्यात १५.७० टक्के औद्योगिक घटक कार्यरत असताना रोजगार मात्र केवळ ६.८२ टक्के इतकाच उपलब्ध आहे. म्हणजेच जास्त रोजगार देणाऱ्या उद्योगांचे प्रमाणही प्रदेशनिहाय विषम आहे.

८) औद्योगिक दृष्टीकोनातून मराठवाडा प्रदेश हा इतर प्रदेशांच्या तुलनेत मागे असलेला दिसून येतो. औद्योगिक विकासामुळे प्रदेशातील कारखान्यांची संख्या वाढते व त्यामुळे त्या प्रदेशातील लोकांना रोजगार उपलब्ध होतो. महाराष्ट्रामध्ये उद्योग विकासाच्या बाबतीत खूपच मोठी तफावत असल्याचे दिसून येते. कारखान्यातील कामगारांचे राज्यातील एकूण कारखान्यातील कामगारांपैकी केवळ ६.७ टक्के इतके कामगार मराठवाडा प्रदेशात, ८.६ टक्के इतके कामगार विदर्भ प्रदेशात आणि ८४.७ टक्के इतके कामगार उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये काम करतात. यातून कारखान्यातील उपलब्ध रोजगारामध्ये राज्यात प्रदेशनिहाय असमतोल स्पष्टपणे जाणवतो.

९) मराठवाड्यामध्ये दारिद्र्य रेषेखाली असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण हे राज्यातील इतर प्रदेशांपेक्षा खूपच जास्त आहे. सन २००४-०५ साली मराठवाडा प्रदेशामध्ये ग्रामीण भागातील लोकांचे दारिद्र्याचे प्रमाण हे ४२.६ टक्के इतके होते व राज्याचे सरासरी प्रमाण हे २९.६ टक्के इतके होते. मराठवाड्यात नागरी भागात ६६.६२ टक्के इतके लोक दारिद्र्याच्या आवस्थेमध्ये आहेत, तर याची राज्य सरासरी प्रमाण हे ३२.१ टक्के इतके होते. मराठवाड्यातील दारिद्र्याचे प्रमाण हे राज्य सरासरीच्या दुपटीपेक्षाही जास्त असल्याचे दिसून येते. राज्यातील इतर प्रदेशांच्या तुलनेत दारिद्र्याचे प्रमाण जास्त असणे हे मराठवाड्याच्या मागासपणाचे लक्षण आहे.

१०) मराठवाडयाचा शैक्षणिक मागासपणा ठळकपणे नजरेत भरण्यासारखा आहे. जनगणना २०११ च्या उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्राचा सरासरी साक्षरता दर हा ८२.९ टक्के इतका आहे. याचा प्रदेशनिहाय विचार केल्यास, उर्वरित महाराष्ट्र ८१.९६ टक्के, मराठवाडा ७६.३६ टक्के आणि विदर्भ ८३.५९ टक्के इतके साक्षरतेचे प्रमाण आहे. मराठवाडा प्रदेशाचा साक्षरता दर हा राज्य सरासरी तसेच इतर प्रदेशांच्या तुलनेत बराच कमी असलेला दिसून येतो.

११) राज्यातील विद्यार्थी गळतीच्या प्रमाणाचा विचार केल्यास, इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत विद्यार्थी गळतीचे राज्यपातळीवरील प्रमाण हे ३७.५ टक्के इतके आहे. याचा प्रदेशनिहाय विचार केल्यास, उर्वरित महाराष्ट्र ३४.२० टक्के, मराठवाडा ४८.५७ टक्के आणि विदर्भ ३२.३०

टक्के इतके असल्याचे दिसून येते. राज्यामध्ये सर्वात जास्त विद्यार्थी गळती ही मराठवाडा प्रदेशामध्ये आहे. यावरून मराठवाड्यातील सामाजिक मागासपणही लक्षात येते.

१२) राज्यातील उच्च शिक्षणाचा विचार केल्यास, सध्या अस्तित्वात असलेल्या एकूण २० राज्य विद्यापीठांपैकी मराठवाड्यामध्ये केवळ ३ विद्यापीठे कार्यरत आहेत. विदर्भामध्ये ६ आणि उर्वरित महाराष्ट्रामध्ये ११ विद्यापीठे कार्यरत आहेत. यावरून उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणाऱ्या विद्यापीठाबाबत महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल असल्याचे दिसून येते.

१३) प्रति लक्ष लोकसंख्येमागे शैक्षणिक संस्थांची संख्या (सन २०१२-१३) मराठवाडा प्रदेशामध्ये ११२, विदर्भ प्रदेशामध्ये १०१ आणि उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये ८१ इतकी आहे. मराठवाडा प्रदेशामध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय अभ्यासक्रमाची उपलब्ध प्रवेश क्षमता ही राज्यातील एकूण उपलब्ध प्रवेश क्षमतेच्या १५.६५ टक्के प्रवेश उपलब्ध आहेत. हेच प्रमाण उर्वरित महाराष्ट्र प्रदेशामध्ये ५६.८१ टक्के आणि विदर्भ प्रदेशामध्ये २७.५२ टक्के इतके आहे. वैद्यकीय शिक्षणामध्ये महत्वपूर्ण असलेल्या विषमचिकित्सा (MBBS) अभ्यासक्रमातील प्रवेश क्षमतेचा विचार केल्यास, मराठवाड्यात १३.२९ टक्के इतके, विदर्भ २४.७ टक्के इतके आणि उर्वरित महाराष्ट्रात ६२.६२ टक्के इतके प्रवेश उपलब्ध आहेत. मराठवाड्यामध्ये वैद्यकीय शिक्षण सुविधेच्याबाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात कमी सुविधा असल्याचे दिसून येते.

१४) एखाद्या प्रदेशामध्ये वीजेचा वापर किती प्रमाणात होतो. यावरून त्या प्रदेशाच्या विकासाची पातळी आपल्या लक्षात येते. दरडोई घरगुती वीज वापर हा त्या प्रदेशातील लोकांची सधनता स्पष्ट करतो, तर दरडोई औद्योगिक वीज वापरातून त्या प्रदेशातील औद्योगिक विकास समजून येतो. राज्यात सरासरी दरडोई घरगुती वीज वापराचा (सन २०१२-१३) प्रदेशनिहाय विचार केल्यास मराठवाड्यात याचे प्रमाण ८६.९ किलोवॅट तास, विदर्भ १३९.८ किलोवॅट तास आणि उर्वरित महाराष्ट्रात २७५ किलोवॅट तास इतक्या प्रमाणात वीज वापर होतो. दरडोई औद्योगिक वीज वापराचा प्रदेशनिहाय विचार केल्यास, मराठवाड्यात १७२.१ किलोवॅट तास, विदर्भ १७५.१ किलोवॅट तास आणि उर्वरित महाराष्ट्रात ३९८.७ किलोवॅट तास इतका वीज वापर होतो. ज्या प्रदेशामध्ये दरडोई वीज वापराचे प्रमाण हे जास्त असते, तो प्रदेश तुलनेने सधन समजला जातो. यातून महाराष्ट्रातील विकासात प्रदेशनिहाय खूप मोठी तफावत आहे असे आपणास म्हणता येईल.

१५) कुटुंबाकडे स्वमालकीचे मोटार वाहन असणे हे उच्चतम जीवनाचे एक महत्वपूर्ण निर्देशक समजले जाते. महाराष्ट्रातील प्रति लक्ष लोकसंख्येमागे असणाऱ्या मोटार वहानांचा प्रदेशनिहाय विचार केल्यास हे प्रमाण मराठवाड्यात सरासरी १२,८११ इतके, विदर्भ प्रदेशात १६,०५५ इतके आणि उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात २०,९७४ इतके आहे. मोटार वहाने ही त्या प्रदेशातील लोकांची क्रयशक्ती दाखवून देतात. यातून त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नाची कल्पना येते. त्यांच्या जीवनाचा स्तर आपल्या लक्षात येतो. याबाबतीत महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल आहे.

१६) महाराष्ट्रामध्ये दरडोई उत्पन्नाचा विचार केल्यास, त्यात खूप मोठ्या प्रमाणात प्रादेशिक असमतोल दिसून येतो. वर्ष २०१२-१३ या वर्षाचे महाराष्ट्र राज्याचे सरासरी दरडोई उत्पन्न रू. १,०३,९९१ इतके होते. याच वर्षामध्ये उर्वरित महाराष्ट्राचे सरासरी दरडोई उत्पन्न हे रू. १,१५,०५४ इतके, विदर्भ प्रदेशाचे रू. ७७,५४४ इतके आणि मराठवाड्याचे रू. ६६,५६१ इतके होते. मराठवाड्याचे सरासरी दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या ४६.६३ टक्केने कमी आहे. तसेच विदर्भाचे सरासरी दरडोई उत्पन्न हे उर्वरित महाराष्ट्राच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा ३६ टक्केने कमी आहे. सन १९७८-८९ (FFC Report) मध्ये मराठवाड्याचे सरासरी दरडोई उत्पन्न हे रू. १,०३६ इतके होते आणि ते राज्य सरासरीच्या दरडोई उत्पन्नाच्या (रू. १५७०) च्या प्रमाणात ६६ टक्के इतके होते. सन २०१२-१३ मध्ये मराठवाड्याचे सरासरी दरडोई उत्पन्न हे रू. ६६,५६१ इतके होते ते राज्य सरासरीच्या (१,०३,९९१) च्या तुलनेत ६४ टक्के इतके आहे. म्हणजेच मराठवाड्यातील सरासरी दरडोई उत्पन्नामध्ये घट झालेली दिसून येते.

१७) महाराष्ट्रामध्ये मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीतही प्रादेशिक तफावत ही खूपच चिंताजनक आहे. सन २०११ मधील राज्याचा मानव विकास निर्देशांक हा सरासरी ०.७५२ इतका असून मराठवाड्यातील सर्व आठही जिल्हे हे याच्या खाली आहेत.

**महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय मानव विकासाच्या वर्गवारीनुसार जिल्ह्यांची संख्या**

| अ.क्रं. | वर्गवारी | मराठवाडा | | विदर्भ | | उर्वरित महाराष्ट्र | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००२ | २०११ | २००२ | २०११ | २००२ | २०११ | २००२ | २०११ |
| १ | अति उच्च मानव विकास जिल्हे | -- | -- | ०१ | ०१ | ०८ | ०९ | ०९ | १० |
| २ | उच्च मानव विकास जिल्हे | ०१ | ०१ | ०४ | ०२ | ०३ | ०४ | ०८ | ०७ |
| ३ | मध्यम मानव विकास जिल्हे | ०३ | ०२ | ०३ | ०६ | ०२ | -- | ०८ | ०८ |
| ४ | निम्न मानव विकास | ०४ | ०५ | ०३ | ०२ | ०२ | ०२ | ०९ | ०९ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जिल्हे | | | | | | | | |
| | **एकूण** | ०८ | | ११ | | १५ | | ३४ | |

**स्त्रोत :-** महाराष्ट्र मानव विकास अहवाल - २०१२, तक्ता क्रं. २.२, पृष्ठ क्रं. १४.

वरील तक्त्यातील माहितीवरून आपणाला असे लक्षात येते की, राज्याच्या मानव विकास निर्देशांकाच्या जिल्हानिहाय क्रमवारीत खालून ११ जिल्ह्यात मराठवाड्यातील सात जिल्हे आहेत. म्हणजेच मानव विकासाच्या बाबतीत मराठवाडा महाराष्ट्रातील इतर प्रदेशांच्या तुलनेने खूपच मागे असलेला दिसून येतो. अशा प्रकारे मानव विकासाच्या संकल्पनेवरून राज्यातील प्रादेशिक असमतोल वाढल्याचे दिसून येते.

१८) राज्यातील विकास कामांच्या वार्षिक नियोजन नियतव्ययामध्ये अनुशेष निर्मुलन योजनासाठीच्या निधीचे प्रमाण अत्यंत कमी असून याउलट गैर अनुशेष निधीचे प्रमाण अधिक असल्यामुळे नवीन अनुशेष तयार होत आहे. त्याचबरोबर वार्षिक योजनेतील मोठा हिस्सा विकसित भागामध्ये खर्च केला जात असल्यामुळे मागास प्रदेश आधिक मागास तर विकसित प्रदेश अधिक विकसित होऊन मागास प्रदेशाच्या विकासातील अंतर वाढत जाऊन राज्यातील प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चालला आहे.

१९) नागपूर कराराप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या रचनेमध्ये तिन्ही प्रदेशांच्या लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याचे ठरले होते. परंतु त्याची काटेकोर अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. १९५७ पासून मराठवाडा प्रदेशातील लोकप्रतिनिधींना राज्य मंत्रिमंडळामध्ये स्थान मिळत असले तरी ते समाधानकारक दिसून येत नाही. एक तर त्यांचे मंत्रिमंडळातील प्रमाण हे खूपच कमी असते. आणि त्यांना मिळालेले खातेदेखिल सर्वसाधारण असतात. प्रत्येक मंत्री आपल्या विभागाची धोरणे ठरविताना आपल्याच विभागाचा विचार जास्त करतो त्यामुळेही राज्यातील विकासात प्रदेशनिहाय विषमता निर्माण झालेली दिसून येते.

२०) मराठवाडा प्रदेशातील जनता व राजकीय नेते आपल्या भागाच्या विकासाबाबत शासनावर पुरेशे दडपण आणण्यात यशस्वी ठरत नाहीत. हे आपणाला अनेक वर्षापासून रखडत पडलेल्या परळी-बीड-नगर रेल्वे लाईन, कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याचे हक्काचे २१ अ.घ.फू. पाणी मिळणे, या विभागाच्या विकासासाठी आणखी एका विभागीय महसूल आयुक्तालयाची निर्मिती या प्रश्नावरून आपल्या लक्षात येते.

## ६) उपाय योजना :-

वरील प्रमाणे सध्याच्या महाराष्ट्रामध्ये मराठवाडा या उपप्रदेशाच्या संदर्भात अध्ययन केल्यानंतर निष्कर्ष रूपाने काही गोष्टी पुढे येतात. या निष्कर्षाच्या आधारे राज्यामध्ये समतोल प्रादेशिक विकास साध्य करण्याकरिता विशेषतः मराठवाड्यासारख्या मागास प्रदेशाच्या विकासाकरिता उपरोक्त सर्व बाबींचा अभ्यास केला असता, खालील महत्वपूर्ण उपाय योजना सांगता येतील.

१) राज्यातील विकासाच्या योजना आखताना व राबविताना प्रदेशनिहाय समन्याय्य धोरण दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे. राज्याच्या विकासासाठी प्रदेश हा घटक गृहीत धरून राज्य संकोषातील विकास निधींचे समन्यायी वाटप करण्यात यावे. त्याचबरोबर वेगवेगळ्या विकास योजनांसाठी वार्षिक अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीप्रमाणे संबंधित मागास प्रदेशात प्रत्यक्ष खर्च केला जावा. मागास प्रदेशाचा निधी हा विकसित प्रदेशाकडे न वळविता पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये मागील वर्षाच्या अखर्चित निधीची तरतूद करण्यात यावी.

२) राज्याच्या विकासाची धोरणे समन्याय्य पध्दतीने आखण्यात यावीत. त्याचबरोबर प्रत्येक विकास योजनेची सुरूवात ही मागास प्रदेशातूनच करण्यात यावी. विशेषतः पायाभूत सुविधांच्या बाबतीत हे तत्व काटेकोरपणे अंमलात येणे गरजेचे आहे. मुंबई - हैद्राबाद या पूर्वीच्या राष्ट्रीय महामार्ग क्रं. ९ च्या विस्तारिकरणाची सुरूवात मुंबईपासून केल्याने हा मार्ग सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीपर्यंत खूप वेगाने बनला, मराठवाड्यात मात्र हा वेग खूपच कमी दिसून येतो. त्यामुळेच महाराष्ट्रातील विकासातील प्रदेशनिहाय विकासातील अंतर वाढत असलेले दिसून येते.

३) मागास प्रदेशाच्या विकासासाठी केवळ पॅकेज आणि अर्थसंकल्पिय तरतुदी करून भागत नाही, तर मंजूर निधी विकास कामावर योग्य वेळी आणि चांगल्या पध्दतीने खर्च झाला पाहिजे. उभा राहिलेला प्रकल्प सर्व सामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासकीय यंत्रणेकडून योग्यरित्या वापरला जातो किंवा नाही याकडे त्या विभागातील मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, जागरूक नागरिक यांनी बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे.

४) शेती करणाऱ्या कुटुंबाच्या कृषी क्षेत्रात घट होत असल्याने शेतीवर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालणे अवघड बनले आहे. त्याचबरोबर शेतकरी हा अल्प भूधारक बनल्यामुळे त्याला आधुनिक अवजारे, बैल जोडी घेणे व सांभाळणे परवडत नाही. त्यासाठी समूह शेती किंवा गट शेतीचा पर्याय योग्य ठरतो. याकरिता प्रत्येक गावात 'कृषी सेवा केंद्र' काढून त्यांच्यामार्फत शेतीची नांगरणी, वखरणी, भिजवणी, पेरणी, कापणी, मळणी आणि विविध कामे योग्य दरात करून देणाऱ्या व्यवस्था निर्माण करून देण्यात स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

५) राज्यामध्ये सिंचन सुविधा निर्माण करताना त्यात प्रादेशिक राजकारण न आणता राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याबाबतीत मागास प्रदेशातील सिंचनाचा अनुशेष लवकरात लवकर दूर केला पाहिजे तसेच मराठवाड्याला कृष्णा-

भीमा, तापी खोऱ्यातील हक्काचे पाणी मिळाले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये नदी जोड प्रकल्प अभियान राबवून अतिरिक्त पाणी खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यांकडे परिवहन करून राज्यातील पाणी टंचाई दूर करण्याचा शासनाने प्राधान्याने प्रयत्न केला पाहिजे.

६) मराठवाड्यातील गोदावरी, पूर्णा, मांजरा, तेरणा, कयाधू, मन्यार इ. सर्व प्रमुख नद्यांवर पाणी अडविण्यासाठी साखळी पध्दतीने बॅरेजेस्‌ची उभारणी करण्यात यावी. एका बॅरेजेस्‌चा शून्य बिंदू पातळी तेथे नवीन बॅरेजेस्‌ची उभारणी करण्यात यावी. त्याचबरोबर पाण्याची साठवणूक ही पायथा ते माथा या पध्दतीने होणे गरजेचे आहे. यामुळे मागास प्रदेशामध्ये असलेली जल तूट कमी होईल.

७) मराठवाड्यामध्ये शेतीत घेतल्या जाणाऱ्या पीकांचा शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला मिळण्यासाठी त्या त्या प्रदेशात उत्पादित होणाऱ्या पीक रचनेनुसार कृषीमाल प्रक्रिया उद्योग उभारले पाहिजेत. मराठवाड्यात कापूस उत्पादित होतो, मात्र त्याचा धागा आणि कापड तयार करण्यासाठी तो मराठवाड्याच्या बाहेर पाठविला जातो. येथे असलेल्या सुत गिरण्या दयनीय आवस्थेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना प्राथमिक उत्पादनाबरोबरच द्वितीय व तृतीय उद्योगातून अपेक्षित असलेले लाभ मिळत नाहीत म्हणून येथे कृषी प्रक्रिया उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे.

८) मराठवाड्यामध्ये दहावी पास / नापास व बेकार / अर्ध बेकार मुले खूप आहेत. त्यांना मराठवाडा कृषी विद्यापीठाने ग्रामीण पातळीवर वैज्ञानिक शेतीला आवश्यक असलेल्या कृषी सेवांचे प्रशिक्षण विशेष उपक्रम हाती घेऊन देण्यात यावे. अशा प्रकारे प्रशिक्षित झालेली मुले गावात किंवा जवळच्या चार पाच गावांकरिता वैज्ञानिक शेतीचे मार्गदर्शन व आवश्यक ती मदत पुरविण्याचे काम 'शेती विकास दूत' म्हणून करतील. त्याचा लाभ मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी अत्यंत फायदेशीर ठरेल.

९) मराठवाड्यात विकासाचे कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था या फारच थोड्या आहेत. मराठवाड्यातल्या प्रत्येक जिल्हा, तालुका व गाव पातळीवर विचारवंत, विद्वान अभ्यासक व तळमळीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा विकास मंडळ किंवा विकास विचार मंडळ अशा संस्था काढल्या पाहिजेत. या मंडळांनी शासकीय योजनांबाबत समुपदेशन करावे, तसेच प्रशासनालाही विकास धोरणे ठरविणे व त्याची अंमलबजावणी करणे याबाबत उद्युक्त करावे. यामुळेही मागास भागाच्या विकासाला चालना मिळू शकेल.

१०) शासकीय मदतीमध्ये मागास भागातील शेतकऱ्यांबाबत खूपच भेदभाव दिसून येतो. तो लवकरात लवकर दूर करण्यात यावा. कृषी कर्जाचे वितरण हे राज्यातील सर्व प्रदेशामध्ये समप्रमाणात करण्यात यावे इतकेच नाही तर मागास प्रदेशाला याबाबतीत अधिक झूकते माप देण्याची आवश्यकता आहे. यामुळे मागास प्रदेशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविता येतील.

११) कमी मानव विकास निर्देशांक असलेल्या जिल्ह्यांमध्ये लोकांचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी औद्योगिकरणाच्या क्षेत्राचा विस्तार झाला पाहिजे. त्याकरिता मागास प्रदेश, जिल्ह्यांमध्ये उद्योग उभारणीसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे, त्यसाठी सवलती व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

१२) ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यासाठी कृषी विकासावर भर दिला पाहिजे. त्यासाठी शेतीला मुबलक सिंचनाबरोबरच शेतीपूरक उद्योग कुक्कुट पालन, इमू पालन, शेळी पालन, वऱ्हापालन अशा शेतीपूरक उद्योग निर्मितीस शासनाने सहकार्य व प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. तसेच तुती लागवड, फलोत्पादन, शेतीमाल प्रक्रिया उद्योग निर्मितीस चालना दिली पाहिजे.

१३) मराठवाड्याचे मागासपण दारिद्र्याची अनेक सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि प्रशासकीय कारणे आहेत. या कारणांचा व विकासातील अडचणींचा स्वतंत्रपणे अभ्यास करून सर्व क्षेत्रांतील विविध कार्यक्रमांना प्रदेश विशिष्ट स्वरूप देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने राज्यातील सर्व प्रदेश व जिल्ह्यांसाठी प्रदेशनिहाय व जिल्हानिहाय कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारची धोरणे ठरवून त्याची व्यवस्थित अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

१४) मराठवाडा विभागात वेरूळ, अजिंठा, पैठण (औरंगाबाद), परळी वैजेनाथ, आंबाजोगाई (बीड), औंढा नागनाथ (हिंगाली), तुळजापूर (उस्मानाबाद), माहूर (नांदेड) इत्यादी पर्यटन स्थळांना राज्यातील व राज्याबाहेरील पर्यटकांची गर्दी जमते. त्यामुळे शासनाने दक्षिण भारतातील देवस्थानाप्रमाणे या स्थळांच्या विकासासाठी योग्य आराखडा व निधी उपलब्ध करून द्यावा. मराठवाड्यातील पर्यटन स्थळांचा योग्य विकास झाल्यास स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

१५) मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यांचे साक्षरता प्रमाण हे राज्य सरासरीच्या खाली आहे. यासाठी शासनाने शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करावा व त्याचा लाभ गरजूंना मिळेल अशी व्यवस्था निर्माण करावी. विद्यार्थ्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम हा रोजगारक्षम असला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये 'कौशल्य प्रशिक्षण केंद्र' स्थापन करून विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार एखाद्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात यावे. मराठवाड्याचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी येथे राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था (एन आय टी), भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय आय टी), भारतीय व्यवस्थापन संस्था (आय आय एम) यांची स्थापना करण्यात यावी.

१६) महाराष्ट्रातील मागास प्रदेशातील लोक प्रतिनिधींना मुख्यमंत्री पदासह इतर कांही महत्वपूर्ण खात्यांची मंत्रीपदे फिरत्या पध्दतीने देण्यात यावीत. यामुळे संबंधित मंत्री आपल्या भागाच्या विकासाला न्याय देऊ शकेल.

१७) सध्या महाराष्ट्रामध्ये सहा प्रशासकीय विभाग असून बहुतेक सर्व विभागामध्ये प्रत्येकी पाच जिल्ह्यांसाठी एक विभागीय आयुक्तालय आहे. मराठवाड्यामध्ये एकूण आठ जिल्हे असून संपूर्ण मराठवाडा विभागासाठी एकच महसूल आयुक्तालय आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्हे

हे मागास असल्यामुळे येथे विकास योजनांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी होण्यासाठी एक नवीन महसूल विभाग स्थापन करण्यात यावा. यामुळे सर्व खात्यांच्या प्रशासन यंत्रणेची पुष्टी होईल.

१८) शासकीय योजनाबाबत राजकीय समजूतदारपणा महत्वाचा आहे. नवीन विद्यापीठ, आयुक्तालय, एखाद्या विकास यंत्रणेच्या उभारणीत हेवेदावे न करता गरजेच्या ठिकाणी याची प्रस्थापना करण्यात राजकीय नेतृत्वाने पुढाकार घेणे गरजेचे आहे. राजकीय नेतृत्वातील स्पर्धेमुळे मराठवाड्यातील नवीन आयुक्तालय निर्मितीचा प्रश्न मागे पडलेला दिसून येतो. प्रस्थापित असलेल्या शासकीय कार्यालयांचे आपल्या जिल्ह्यात स्थलांतर करण्यापेक्षा नवीनच कार्यालये निर्मिली जावीत असा पुढाकार घेणे गरजेचे आहे. जेणेकरून मागास भागातील जनतेमध्ये परस्पर विश्वास व विकासाबाबत बांधिलकी कायम राहील.

१९) नागपूर करारातील प्रमुख बाबींना चालना देण्यासाठी महत्वाच्या मंत्रालयीन विभागांची तीनही प्रदेशामध्ये समन्यायी विभागणी करण्यात यावी. त्याचबरोबर राज्याच्या आखत्यारीतील नोकऱ्यांमध्ये प्रदेशनिहाय लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे.

२०) एखाद्या प्रदेशाचा विकास केवळ शासनाद्वारेच होत नसतो. शासनाचे कार्य हे केवळ उत्प्रेरक (catalyst) स्वरूपाचे असते. विकासाची अवसंरचना निर्माण करणे, विकासासाठी प्रोत्साहक पायाभूत सोयी सवलती उपलब्ध करून देणे, उद्योगांना चालना देणे ही कार्य शासनाची असतात. शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या या मूलभूत सोयी व सेवांना आपण फार तर विकासाच्या गाडीची चाके म्हणू शकू, त्यांना विकास प्रक्रियेला ओढणारे व गती देणारे इंजिन म्हणता येणार नाही. म्हणूनच विकासाचे खरे यश त्या त्या विभागातील लोक किती प्रयत्न करतात यावर अवलंबून असते. त्यामुळे लोकांना विकासाची जाणीव निर्माण करून त्यादृष्टीने त्यांना कार्यप्रवण करणे महत्वाचे आहे.

२१) मागास प्रदेशातील होतकरू तरूणांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आपल्या बरोबरच आपले बांधव व परिसराच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा. लोकशाहीमध्ये जागृत जनताच विकासाची गंगा खेचून आणण्यात यशस्वी होते म्हणूनच आपल्या भागाच्या विकासासाठी सर्वांनी सतर्क राहणे आवश्यक आहे.

**७) सारांश :-**

संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ सुरू झाली तेंव्हा मराठी भाषा बोलणारे लोक मुंबई, मध्य प्रदेश व हैद्राबाद अशा तीन राज्यात विखुरले होते. तिन्ही राज्यात मराठीखेरीज इतर भाषिकांची बहुसंख्या असल्याने विकासाबाबत मराठी भाषिक प्रदेशांना न्याय मिळत नाही अशी तिन्ही राज्यात त्यांची भावना होती. ती राज्ये सोडून संयुक्त महाराष्ट्रात एकत्र आल्यानंतर सर्व प्रदेशांना आपल्या विकासाचा न्याय्य वाटा मिळेल अशी अपेक्षा होती. त्यामुळेच मराठवाडा महाराष्ट्रात बिनशर्त सामील झाला. अगदी सुरूवातीपासूनच सावत्रभाव सहन करणाऱ्या मराठवाड्याच्या नशिबी ५७वर्षानंतरही विकासाच्या बाबतीत उपेक्षाच झाल्याचे दिसून येते. पाणी, पायाभूत सुविधा, उद्योग, दळण वळण, शिक्षण, आरोग्य अशा सर्वच बाबतीत गरजेपेक्षा किती तरी कमी दिल्याने महाराष्ट्राच्या विकासातील असमतोल वाढत गेला. त्यामुळे आज मराठवाड्याचा अक्षरशः मागासवाडा बनला आहे. त्यातुलनेत पश्चिम महाराष्ट्र मात्र प्रगत होत गेला आहे.

मागील वर्षातील महाराष्ट्राच्या प्रगतीचा आढावा घेत असताना विविध प्रदेशामध्ये विकासाचा असमतोल दिसून येतो. हा असमतोल विविध पातळीवर असून त्याला इतरही अनेक कारणांबरोबरच राजकारणाचाही फार मोठा भाग असलेला दिसून येतो. मागास भागातील जनतेला याची जशी जशी जाणीव होईल तशी आंध्र प्रदेशातील स्वतंत्र तेलंगणाच्या निर्मितीसारखी महाराष्ट्रापासूनही विदर्भ, मराठवाडा हे प्रदेश अलग होण्यास धडपडतील. त्यामुळे विघटनवादी चळवळीला खतपाणी दिल्यासारखे होईल. गडचिरोलीतील नक्षली चळवळीचा उगम प्रादेशिक मागासलेपणातूनच झाल्याचे सांगितले जाते. तसेच महाराष्ट्रातील परप्रांतीय विरोधी अंदोलनाची पार्श्वभूमी असमतोल विकासात असल्याचे दिसून येते.

राज्यातील सर्वांगिण उन्नतीसाठी समन्याय्य विकास साधायचा असल्यास विकासातील प्रादेशिक असमतोल दूर झाला पाहिजे. त्यासाठी गटबाजी, संकुचितपणा, आत्मकेंदी वृत्ती हे दोष टाळावे लागतील. प्रदेशांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या प्रेरणांच्या वृत्तीचा प्रसार करून लोकांमध्ये भौतिक समृध्दीची आकांक्षा निर्माण केली पाहिजे. शासनावर विकास योजना राबविण्याचे दडपण आणून लोकांना कार्यप्रवृत्त करणे गरजेचे आहे. मागास प्रदेशातील ही स्थिती बदलण्यासाठी जनतेने सतर्क राहून प्रयत्न करण्याची गरज आहे. विकासाची भिक मागून मिळणार नाही त्यासाठी सनदशीर मार्गाने लोक चळवळ उभारणे आवश्यक आहे. त्याशिवाय विकासातील प्रादेशिक राजकारण व विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर होणार नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


- लालजी पेंडसे, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई, ति. आ. १० जुन २०१०.
- भूजंगराव कुलकर्णी, मराठवाड्याचा विकास:अभ्यास व चिंतन, पद्मा प्रकाशन, औरंगाबाद, १९९८.
- प्रा. व. म. सिरसीकर, आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००८.
- महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रमुख संपादक, सुहास पळशीकर व नितीन बिरमल, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती -२००७.

- महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचा अहवाल, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑक्टोंबर २०१३.
- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, वार्षिक अहवाल : २०१२-१३, मुंबई, महाराष्ट्र.
- मराठवाडा वैधानिक विकास मंडळ, वार्षिक अहवाल, विविध वर्ष.
- महाराष्ट्रातील जिल्ह्यांचे आणि भारतातील राज्यांचे निवडक निर्देशक २०१२-१३, अर्थ व सांखिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.
- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,२०१३-१४.
- Maharashtra Human Development Report २०१२, Yashawantrao Chavan Academy of Development Administration, Rajbhavan Complex,Baner Road, Pune,२०१४.